# जाहीरनामा
## उपविभागीय दंडाधिकारी, मौदा यांचे कार्यालय

**मौदा उपविभागात रिक्त असलेली पोलीस पाटील पदे भरण्याबाबत जाहीरनामा**

जाहीरात क्र.ना.तह/उविअ-मौदा/कावि-166/2023, दिनांक02/05/2023

नागपूर जिल्हयातील मौदा उपविभागाचे उपविभागीय दंडाधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील (मौदा व कामठी तालुका) गावात पोलीस पाटील पदभरतीसाठी अर्हताधारक उमेदवारांकडून विहीत नमून्यात फक्त ऑनलाईन पध्दतीने **www.sdomoudapp.in** या संकेत स्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | करावयाची कार्यवाही | दिनांक |
|---|---|---|
| 1 | जाहीरनामा प्रसिदध करणे | दि.02 मे 2023 |
| 2 | परीक्षा शुल्कासह ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी. | दि. 02/05/2023 ते 17/05/2023 |
| 3 | परीक्षा शुल्क व अर्ज ऑनलाईन भरण्याची अंतीम मुदत | दि.17/05/2023 मध्यरात्री 12.00 पर्यंत |

सरळसेवा भरती प्रक्रियेची सविस्तर जाहीरात **www.sdomoudapp.in** या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. अर्जदाराने संपूर्ण प्रक्रिया काळजीपूर्वक समजून ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. पोलीस पाटील पदाचे परिक्षेचा अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारले जातील. ऑनलाईन अर्जासह आवश्यक दाखले मूळ प्रतीतून स्कॅन करून ऑनलाईन सादर करावे परीक्षा फी सुध्दा ऑनलाईन भरणा करावी त्याशिवाय सदर फॉर्म ऑनलाईन सादर होणार नाही. प्रस्तूत पदाकरिता केवळ उक्त संकेत स्थळावर विहीत ऑनलाईन पध्दतीने भरलेला अर्ज ग्राहय धरण्यात येतील. सदर संकेत स्थळावर भरती प्रक्रिया दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्यावत व जागृत राहण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील.

भरती प्रक्रिया परिक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशत: बदल करणे पदाच्या एकूण व आरक्षण प्रवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार उपविभागीय दंडाधिकारी, मौदा यांनी राखून ठेवले असून त्याचा निर्णय अंतिम असेल, यांची सर्वांनी नोंद घ्यावी. मौदा उपविभागातील मौदा व कामठी तालुक्यातील पोलीस पाटीलांची मंजूर पदे, रिक्त पदे तसेच 30% महिलांसाठी आरक्षित ठेवलेली पदे विचारात घेवून सद्यस्थितीत जी पदे भरणे आवश्यक आहे, त्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे.

## विविध प्रवर्गाच्या आरक्षणासाठी खालीलप्रमाणे गावे प्रस्तावित आहेत.

| अ.क्र. | गावांचे नाव | तालुका | आरक्षणाचा प्रवर्ग | महिला आरक्षण |
|---|---|---|---|---|
| १ | नेरला | कामठी | अनु.जाती | |
| २ | चेहडी | मौदा | अनु.जाती | |
| ३ | खापरखेडा(जंगली | मौदा | अनु.जाती | |
| ४ | पिंपळगाव | मौदा | अनु.जाती | |
| ५ | जाखेगाव | कामठी | अनु.जाती | |
| ६ | हिंगणा | मौदा | अनु.जाती | |
| ७ | लिहीगाव | कामठी | अनु.जाती | |
| ८ | पांजरा | मौदा | अनु.जाती | |
| ९ | महादुला | कामठी | अनु.जाती | |
| १० | हिवराबली | मौदा | अनु.जाती | |
| ११ | तांदुळवानी | कामठी | अनु.जाती | |
| १२ | खैरी | कामठी | अनु.जाती | |
| १३ | शिवनी | मौदा | अनु.जाती | |
| १४ | मांगलीचांदे | मौदा | अनु.जाती | |
| १५ | मांगलीगोसावी | मौदा | अनु.जाती | |
| १६ | लापका | मौदा | अनु.जाती | |
| १७ | आवंढी | कामठी | अनु.जाती | |
| १८ | वारेगाव | कामठी | अनु.जाती | महिला राखीव |
| १९ | बारसी | मौदा | अनु.जाती | महिला राखीव |
| २० | खंडाळा(गांगणेर) | मौदा | अनु.जाती | महिला राखीव |
| २१ | नवेगाव(कोराड) | मौदा | अनु.जाती | महिला राखीव |
| २२ | बोरगाव | कामठी | अनु.जाती | महिला राखीव |
| २३ | खापडी | मौदा | अनु.जाती | महिला राखीव |
| २४ | इसापुर | मौदा | अनु.जाती | महिला राखीव |
| २५ | खंडाळा(गुजर) | मौदा | अनु.जाती | महिला राखीव |
| २६ | पांढुर्णा | कामठी | अनु. जमाती | |
| २७ | सावंगी | मौदा | अनु.जमाती | |
| २८ | बानोर | मौदा | अनु. जमाती | |
| २९ | घोरपड | कामठी | अनु. जमाती | |
| ३० | तरोडी | मौदा | अनु. जमाती | |
| ३१ | मांगली | कामठी | अनु. जमाती | |
| ३२ | सिंगोरी | मौदा | अनु. जमाती | |
| ३३ | उमरी | कामठी | अनु. जमाती | |
| ३४ | बेरडेपार | मौदा | अनु. जमाती | |
| ३५ | खापरखेडा | कामठी | अनु. जमाती | महिला राखीव |
| ३६ | अडेगाव | मौदा | अनु. जमाती | महिला राखीव |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३७ | खापरखेडा (तेली) | मौदा | अनु. जमाती | महिला राखीव |
| ३८ | तरोडीखुर्द | कामठी | अनु. जमाती | महिला राखीव |
| ३९ | म्हसाळा | कामठी | विशेष मागास प्रवर्ग | |
| ४० | नरसाळा | मौदा | विशेष मागास प्रवर्ग | |
| ४१ | दुधाळा | मौदा | विशेष मागास प्रवर्ग | |
| ४२ | चिचोली | मौदा | विशेष मागास प्रवर्ग | महिला राखीव |
| ४३ | आष्टि(दहेगाव) | मौदा | विमुक्त जाती(अ) | |
| ४४ | सुकळी(देव) | मौदा | विमुक्त जाती(अ) | |
| ४५ | नेरी | कामठी | विमुक्त जाती(अ) | |
| ४६ | बाबदेव | मौदा | विमुक्त जाती(अ) | |
| ४७ | निमखेडा | मौदा | विमुक्त जाती (अ) | महिला राखीव |
| ४८ | महालगाव | कामठी | विमुक्त जाती (अ) | महिला राखीव |
| ४९ | नवेगाव(रेल्वे) | मौदा | भटक्या जमाती(ब) | |
| ५० | केम | कामठी | भटक्या जमाती(ब) | |
| ५१ | निहारवाणी | मौदा | भटक्या जमाती(ब) | |
| ५२ | धर्मापुरी | मौदा | भटक्या जमाती(ब) | महिला राखीव |
| ५३ | पांजरा | कामठी | भटक्या जमाती(ब) | महिला राखीव |
| ५४ | चिरव्हा | मौदा | भटक्या जमाती(क) | |
| ५५ | सेलु | कामठी | भटक्या जमाती(क) | |
| ५६ | चिकना | कामठी | भटक्या जमाती(क) | |
| ५७ | देवमुंढरी | मौदा | भटक्या जमाती(क) | |
| ५८ | मांगली(तेली) | मौदा | भटक्या जमाती(क) | महिला राखीव |
| ५९ | सिरसोली | मौदा | भटक्या जमाती(क) | महिला राखीव |
| ६० | केसोरी | कामठी | भटक्या जमाती(ड) | |
| ६१ | वडोदा | कामठी | भटक्या जमाती(ड) | |
| ६२ | भोवरी | कामठी | भटक्या जमाती(ड) | |
| ६३ | तोंडली | मौदा | भटक्या जमाती(ड) | महिला राखीव |
| ६४ | खेडी | कामठी | इतर मागास प्रवर्ग | |
| ६५ | आसोली | कामठी | इतर मागास प्रवर्ग | |
| ६६ | खरडा | मौदा | इतर मागास प्रवर्ग | |
| ६७ | आष्टि(नवेगाव) | मौदा | इतर मागास प्रवर्ग | |
| ६८ | सावरगाव | मौदा | इतर मागास प्रवर्ग | |
| ६९ | रेवराल | मौदा | इतर मागास प्रवर्ग | |
| ७० | किरणापुर | मौदा | इतर मागास प्रवर्ग | |
| ७१ | एसंबा | मौदा | इतर मागास प्रवर्ग | |
| ७२ | तरोडी(बु) | कामठी | इतर मागास प्रवर्ग | |
| ७३ | नंदापुरी | मौदा | इतर मागास प्रवर्ग | |
| ७४ | खिडकी | मौदा | इतर मागास प्रवर्ग | |
| ७५ | खंडाळा(पिपरी) | मौदा | इतर मागास प्रवर्ग | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७६ | भामेवाडा | कामठी | इतर मागास प्रवर्ग | |
| ७७ | झरप | कामठी | इतर मागास प्रवर्ग | |
| ७८ | कापसी(बु) | कामठी | इतर मागास प्रवर्ग | |
| ७९ | टेमसना | कामठी | इतर मागास प्रवर्ग | |
| ८० | भेंडाळा | मौदा | इतर मागास प्रवर्ग | |
| ८१ | खापा पाटण | कामठी | इतर मागास प्रवर्ग | |
| ८२ | वांजरा | मौदा | इतर मागास प्रवर्ग | |
| ८३ | सुकळी | मौदा | इतर मागास प्रवर्ग | |
| ८४ | नानादेवी | मौदा | इतर मागास प्रवर्ग | |
| ८५ | शिवनी | कामठी | इतर मागास प्रवर्ग | |
| ८६ | सालवा | मौदा | इतर मागास प्रवर्ग | |
| ८७ | चिखली | कामठी | इतर मागास प्रवर्ग | महिला राखीव |
| ८८ | पावनगाव | कामठी | इतर मागास प्रवर्ग | महिला राखीव |
| ८९ | परसाड | कामठी | इतर मागास प्रवर्ग | महिला राखीव |
| ९० | बिडबिना | कामठी | इतर मागास प्रवर्ग | महिला राखीव |
| ९१ | परसोडी | कामठी | इतर मागास प्रवर्ग | महिला राखीव |
| ९२ | चिखलाबोडी | मौदा | इतर मागास प्रवर्ग | महिला राखीव |
| ९३ | झुल्लर | मौदा | इतर मागास प्रवर्ग | महिला राखीव |
| ९४ | वरंभा | कामठी | इतर मागास प्रवर्ग | महिला राखीव |
| ९५ | गोवरी | मौदा | इतर मागास प्रवर्ग | महिला राखीव |
| ९६ | आजनगाव | मौदा | इतर मागास प्रवर्ग | महिला राखीव |
| ९७ | भिलगाव | कामठी | आर्थिक दुर्बल घटक(EWS) | |
| ९८ | पांढरकवडा | कामठी | आर्थिक दुर्बल घटक(EWS) | |
| ९९ | कढोली | कामठी | आर्थिक दुर्बल घटक(EWS) | |
| १०० | नेरला | मौदा | आर्थिक दुर्बल घटक(EWS) | |
| १०१ | रहाडी | मौदा | आर्थिक दुर्बल घटक(EWS) | |
| १०२ | तारसा | मौदा | आर्थिक दुर्बल घटक(EWS) | |
| १०३ | भोवरी | मौदा | आर्थिक दुर्बल घटक(EWS) | |
| १०४ | शिरपुर | कामठी | आर्थिक दुर्बल घटक(EWS) | |
| १०५ | धामनगाव | मौदा | आर्थिक दुर्बल घटक(EWS) | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १०६ | खात | मौदा | आर्थिक दुर्बल घटक(EWS) | |
| १०७ | सिंगोरी/मारोडी | मौदा | आर्थिक दुर्बल घटक(EWS) | महिला राखीव |
| १०८ | बिडगाव | कामठी | आर्थिक दुर्बल घटक(EWS) | महिला राखीव |
| १०९ | गादा | कामठी | आर्थिक दुर्बल घटक(EWS) | महिला राखीव |
| ११० | वायगाव | मौदा | आर्थिक दुर्बल घटक(EWS) | महिला राखीव |
| १११ | खंसाळा | कामठी | आर्थिक दुर्बल घटक(EWS) | महिला राखीव |
| ११२ | महालगाव | मौदा | खुला प्रवर्ग | |
| ११३ | वढना | मौदा | खुला प्रवर्ग | |
| ११४ | कोटगाव | मौदा | खुला प्रवर्ग | |
| ११५ | आडका | कामठी | खुला प्रवर्ग | |
| ११६ | धानला | मौदा | खुला प्रवर्ग | |
| ११७ | निंबा | कामठी | खुला प्रवर्ग | |
| ११८ | अंबाडी | कामठी | खुला प्रवर्ग | |
| ११९ | पानमारा | मौदा | खुला प्रवर्ग | |
| १२० | नांदगाव(पो.स्टे.अरोली( | मौदा | खुला प्रवर्ग | |
| १२१ | नांदगाव(पो.स्टे.मौदा | मौदा | खुला प्रवर्ग | |
| १२२ | निसतखेडा | मौदा | खुला प्रवर्ग | |
| १२३ | खापरखेडा(किराड) | मौदा | खुला प्रवर्ग | |
| १२४ | रनाळा | कामठी | खुला प्रवर्ग | |
| १२५ | सोनेगावराजा | कामठी | खुला प्रवर्ग | |
| १२६ | बोरिघिवारी | मौदा | खुला प्रवर्ग | |
| १२७ | पारडीकला | मौदा | खुला प्रवर्ग | |
| १२८ | नांदा | कामठी | खुला प्रवर्ग | |
| १२९ | लोणखैरी | कामठी | खुला प्रवर्ग | |
| १३० | आसलवाडा | कामठी | खुला प्रवर्ग | |
| १३१ | एकर्डी | कामठी | खुला प्रवर्ग | |
| १३२ | पिपरी | मौदा | खुला प्रवर्ग | |
| १३३ | मारोडी | मौदा | खुला प्रवर्ग | |
| १३४ | गुमथी | कामठी | खुला प्रवर्ग | |
| १३५ | पारडीखुर्द | मौदा | खुला प्रवर्ग | |
| १३६ | कोराड | मौदा | खुला प्रवर्ग | महिला राखीव |
| १३७ | नान्हा | कामठी | खुला प्रवर्ग | महिला राखीव |
| १३८ | ढोलमारा | मौदा | खुला प्रवर्ग | महिला राखीव |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३९ | विरशी | मौदा | खुला प्रवर्ग | महिला राखीव |
| १४० | धानोली | मौदा | खुला प्रवर्ग | महिला राखीव |
| १४१ | वाघबोडी | मौदा | खुला प्रवर्ग | महिला राखीव |
| १४२ | धारगाव | कामठी | खुला प्रवर्ग | महिला राखीव |
| १४३ | येरखेडा | कामठी | खुला प्रवर्ग | महिला राखीव |
| १४४ | उनगाव | कामठी | खुला प्रवर्ग | महिला राखीव |
| १४५ | तांडा | मौदा | खुला प्रवर्ग | महिला राखीव |

**पोलीस पाटील पदाकरिता किमान आवश्यक अर्हता :-**

1) अर्जदार हा दहावी महाराष्ट्र शालांत परिक्षा (एस.एस.सी.) पास असावा.
2) अ) वयोमर्यादेकरिता अर्जदाराचे दिनांक-02/05/2023 रोजीचे वय विचारात घेतले जाईल.
   ब) अर्जदाराचे वय दिनांक 02/05/2023 रोजी 25 पेक्षा कमी नसावे व 45 पेक्षा जास्त नसावे.
   क) पोलीस पाटील पदाकरिता वयोमर्यादा शिथीलक्षम नाही.
3) अर्जदार हा स्थानिक व कायम रहिवाशी असावा व तसा ग्रामसेवकाचा/तलाठी रहिवासी दाखला राशन कार्ड, निवडणूक ओळखपत्र ,आधार कार्ड, ज्या पुराव्याने स्थानिक व कायम रहीवासी असल्याचे सिध्द होते असा कोणताही एक पुरावा मुलाखातीचे वेळी सादर करावा.
4) अर्जदाराने अर्जामध्ये स्वत:चे ई-मेल व Whats App नंबर नमूद करावे.
5) अर्जदार शारिरीकदृष्टया सक्षम असावा व अर्जदाराचे चारित्र्य निष्कलंक असणे आवश्यक आहे.
6) महाराष्ट्र राज्य सेवा (लहान कुटूंबातील प्रतिज्ञापत्र) नियम 2005 मधील लहान कुटूंबाची अर्हता धारण करणे आवश्यक (अर्जदार याची अर्हता दिनांकास दोन पेक्षा जास्त अपत्य नसावेत.)
7) मागास प्रवर्गासाठी आरक्षित पदाकरिता त्या प्रवर्गाचे सक्षम अधिकारी याने निर्गमित केलेले जातीचे प्रमाणपत्र आवश्यक. **तसेच शासन निर्णय सामन्य प्रशासन विभाग क्रं.बीसीसी 2011/प्रजाक्रंती1064-ब दिनांक-12 डिसेंबर 2011 मधील तरतुदीनुसार नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन सहा महिन्याच्या आंत जात वैधता प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करणे आनिवार्य आहे.**
8) इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विजा-अ व भज-ब,क,ड प्रवर्गातील अर्जदार यांना सन 2022-23 कालावधीकरिता वैध असलेले उत्पन्न आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेयर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र आवश्यक राहील.
9) इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विजा-अ व भज-ब,क,ड प्रवर्गातील महिला पदांसाठी अर्ज करणाऱ्या अर्जदार यांना सन 2022-23 कालावधीकरिता वैध असलेले उत्पन्न आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेयर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र आवश्यक राहील.
10) खुला प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) अंतर्गत अर्ज भरणा-या उमेदवाराला संबंधित तहसिलदार यांनी निर्गमित केलेला पात्रता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
11) **परिक्षा शुल्क आरक्षीत /आथिक दुर्बल घटक प्रवर्गासाठी करीता 200/-रु. खुला प्रवर्ग-300/-रु. ऑनलाईन पध्दतीने www.sdomoudapp.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.**

**12) आरक्षणानुसार त्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध न झाल्यास शासन निर्णय क्रं.बी व्ही.पी 1107/प्र.क्र.515/पोल-8 दिनांक-16 ऑक्टोबर 2008 नुसार खालीलप्रमाणे प्रवर्गाचे 3 गट करून त्या गटातील प्रवर्गातील उमेदवारांमधून अदलाबदलीने अर्ज मागविण्यात येईल.**

1. अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती.
2. विमुक्त जाती (अ) व भटक्या जमाती (ब)
3. भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) व इतर मागासवर्गीय.

वरील प्रमाणे गटातीलही उमेदवार उपलब्ध न झाल्यास ते खुल्या प्रवर्गातून भरण्यात येईल.

**परिक्षेचे स्वरुप :-**

| अनु. क्र. | पदनाम संवर्ग | परिक्षेचे गुण | | |
|---|---|---|---|---|
| 1. | पोलीस पाटील | लेखी परिक्षा | तोंडी परिक्षा (मुलाखत) | एकुण गुण |
| | | 80 | 20 | 100 |

**लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप साधारणपणे खालीलप्रमाणे राहील :-**

1. पोलीस पाटील पदाची लेखी परिक्षा 80 गुणांची असेल प्रत्येक प्रश्न एक गुणाचा राहील.
2. लेखी परिक्षेची प्रश्नपत्रिका वस्तूनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाची राहील.
3. लेखी परिक्षा इयत्ता दहावी (एस.एस.सी.) पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारित असेल यात सामान्य ज्ञान, गणित, पोलीस पाटलांचे अधिकार व कर्तव्य, स्थानिक परिसराची माहिती व चालु घडामोडी इत्यादी विषयाचा समावेश असेल.
4. लेखी परिक्षेत एकूण 80 गुणांपैकी किमान 36 गुण (45%) प्राप्त केलेल्या अर्जदारामधील उच्चतम गुण मिळालेल्या पर्याप्त प्रमाणातील अर्जदाराची तोंडी परिक्षा घेण्यात येईल.
5. सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.प्रनिम/2010/2009/प्र.क्र.66/10/13-अ, दिनांक 16/06/2010 मधील तरतूदीनूसार लेखी परिक्षा घेते वेळी उत्तर पत्रिकेवर उत्तर लिहीण्यासाठी अथवा चिन्हांकित करण्यासाठी फक्त काळया शाईचा बॉलपेन वापर करावा लागेल.

**निवड कार्यपध्दती, अटी व शर्ती :-**

1) प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनूसार अंतिम निवडीसाठी अर्जदारांचे शैक्षणिक पात्रता व इतर संबंधित मुळ प्रमाणपत्र तपासणीसाठी मुलाखतीच्या दिवशी उपलब्ध करुन दयावी लागतील. अन्यथा तोंडी परिक्षा अंतिम निवडीसाठी त्याचा विचार केला जाणार नाही.
2) लेखी परिक्षा, तोंडी परिक्षा, कागदपत्रे छाननी इत्यादीकरिता प्रवेशपत्र, कार्यक्रम, विविध सूचना **www.sdomoudapp.in** या संकेत स्थळाला उपलब्ध करुन दिला जातील. भरती प्रक्रियेची माहिती/कार्यक्रमाबाबत अद्यावत व सजग राहण्याची प्रवेश पत्र डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील.
3) लेखी परिक्षेअंती मुलाखतीसाठी पात्र अर्जदारांचे जाहीरातीनूसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मुळ कागदपत्रे पडताळणी करण्याकरिता अंतरिम स्वरुपात यादी जाहीर करण्यात येईल. ज्या अर्जदाराची जाहीरातीनूसार आवश्यक पात्रता व ऑनलाईन

अर्जात भरलेली माहिती कागदपत्रांच्या आधारे परिपूर्ण सिध्द होईल अशाच अर्जदाराचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्प्याकरिता करण्यात येईल. जाहीरातीत नमूद केलेली संपूर्ण अर्हता ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती व मुळ कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास अर्जदाराची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द होवू शकेल. याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

4) अर्जदार शारिरीकदृष्टया सक्षम असल्याबाबतचे अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय यांचे अथवा वरिष्ठ वैद्यकिय अधिका-यांचे प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील व अर्जदाराची पात्रता वैद्यकिय तपासणी अंतीच निश्चित करण्यात येईल.
5) अर्जदाराचे चारित्र्य निष्कलंक असल्याबाबतचे संबंधित पोलीस स्टेशनचे चारित्र्य प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.
6) अर्जदारांचे कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध नसावा. अर्जदार हा नेमणूकीच्या गावी स्थानिक स्वरुपाचा उद्योग करणारा नसावा. त्याचप्रमाणे इतर ठिकाणी संपूर्ण वेळ नोकरी वा धंदा करणारा नसावा. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत सदस्य नसावा. तसेच खाजगी किंवा निमसरकारी संस्थेचा सदस्य नसावा. अथवा पूर्णवेळ नोकरी करणारा नसावा, याबाबतचे रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवरिल प्रतिज्ञापत्र, कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.
7) पोलीस पाटील पदांवरिल नियुक्तीकरिता मृत/सेवानिवृत्त पोलीस पाटलांच्या वारसानांनी अर्ज केल्यास त्याला प्राधान्य देण्यात येईल. परंतू याचा अर्थ एकाच स्थानासाठी (Position) पोलीस पाटलांच्या वारसांसह दोन किंवा अधिक अर्जदारांना समान गुण मिळाल्यास पोलीस पाटलांच्या वारसानांची निवड करण्यात प्राधान्य देण्यात येईल. परंतू तो महाराष्ट्र ग्रामपोलीस पाटील (सेवा प्रवेश, पगार भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती) आदेश 1968 व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणानूसार त्या गावांसाठी ठरविण्यात आलेल्या सामाजिक समांतर आरक्षणाचा असला पाहिजे.
8) अर्जदार संबंधित गावाचा स्थानिक व कायमचा रहिवासी असणे आवश्यक आहे.
9) अर्जदार कोणत्याही एकाच गावाचा स्थानिक/कायमचा रहिवासी असू शकतो. सबब अर्जदाराने अशास एका गावात अर्ज करावा. एकापेक्षा अधिक गावातून केलेले सर्व अर्ज बाद करण्यात येतील.
10) प्रत्येक गावात केवळ एक पद उपलब्ध आहे व ते शासकिय निकषानूसार आरक्षित करण्यात आलेले आहे. अर्ज करतांना अर्जदाराने आरक्षण तपासून अर्ज करावा. (आरक्षण व्यतिरिक्त असलेल्या उमेदवारांनी अर्ज करु नये.)
11) मौदा उपविभागातील रिक्त पदांच्या सर्व गावांसाठी एकाच दिवशी व वेळी परिक्षा घेण्यात येईल.
12) संपूर्ण भरती प्रक्रिया गाव निहाय होणार असून कोणत्याही दोन गावाच्या प्रक्रियेचा एकमेकांशी संबंध नसेल.
13) पोलीस पाटील हे पद वर्गीकृत नाही.
14) पोलीस पाटलांना क्षेत्रिय स्तरावर (Field work) काम करावे लागते. त्यामुळे सदर पद धारण करणारी व्यक्ती ही शारिरीक दृष्टया सक्षम असणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांना अपंगासाठीचे आरक्षण लागू करण्यात आलेले नाही.

15) पोलीस पाटील हे पद एका गावात एकच असते. त्यामुळे हे पद एकाकी असल्याने त्यांना प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, खेळाडू यासारखी समांतर आरक्षणे लागू होत नाहीत.

16) इमाव, विमाप्र, विजाअ, भज ब, भज क, भज ड प्रवर्गातील उमेदवाराने दिनांक 30/03/2023 पर्यंत किंवा त्यानंतर वैध असलेले नॉन क्रिमीलेअरचे सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

17) शासन महिला व बालविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.82/2001/मसेआ/2000/ प्र.क्र.412/का-2, दिनांक 25/05/2001आणि तद्नंतर शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानूसार इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विजा-अ व भज-ब,क,ड प्रवर्गातील महिला आरक्षणा अंतर्गत अर्ज करणाऱ्या महिला अर्जदारांनी सन 2022-2023 या कालावधीकरिता दिनांक 30/03/2023 पर्यंत वैध असलेले उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले मुळ प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

18) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रं.राआधो4019/प्र.क्र.31/16-अ दिनांक-12,फेब्रुवारी ,2019 तसेच 23 डिसेंबर, 2020 नुसार आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांचा या प्रवर्गात मोडना-या उमेदवाराला सन 2022-2023 वर्षी वैद्य असलेले सक्षम अधिकारी यांचे प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य राहील.

19) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन अधिसूचना क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000, दिनांक 28/03/2005 व क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000, दिनांक 01/07/2005 तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 अन्वये दिनांक 28/03/2005 रोजी हयात असलेले व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत लहान कुटूंब असल्याचे विहीत नमून्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणाऱ्या उमेदवारांचे विहीत (अ) नमून्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

20) लेखी परिक्षेत पात्र ठरलेल्या अर्जदारास पोलीस पाटील भरती निवडीसाठी घेण्यात येणाऱ्या 20 गुणांच्या तोंडी (मुलाखत) परिक्षेस अनुपस्थित राहणारा अर्जदार अंतिम निवडीस अपात्र ठरेल. उमेदवाराला मुलाखतीत शुन्य गुण मिळाले असले तरी लेखी परिक्षेतील गुणांच्या आधारे तो जर गुणवत्ता यादीत येत असेल तर अशा अर्जदार पोलीस पाटील पदांवरिल निवडीकरिता पात्र राहील.

21) समान गुण मिळाल्यास अंतिम निवड: शासन निर्णय क्र.डीव्हीपी-1113/1767/प्र.क्र.592/पोल-8, दिनांक 22/08/2014 अन्वये गुणवत्ता यादीतील एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक अर्जदाराला समान गुण मिळाल्यास प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवारांची अंतिम निवड केली जाईल.

अ) पोलीस पाटलांचे वारस, त्यानंतर

ब) अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे अर्जदार, त्यानंतर

क) माजी सैनिक असलेले अर्जदार, त्यानंतर

ड) वयाने जेष्ठ असलेले अर्जदार

पोलीस पाटलांच्या वारसामध्ये पती, पत्नी आणि दोन मुले यांचा समावेश, त्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही नातेवाईकांचा वारस म्हणून विचार करता येणार नाही.

22) याशिवाय महाराष्ट्र ग्रामपोलीस अधिनियम 1967 व त्यास संलग्न असलेले नियम आणि वेळोवेळी शासनानी निर्गमित केलेले आदेश, शासन निर्णय, परिपत्रकांतील नेमणूकीसाठी इतर प्रचलित असलेल्या अटी सुध्दा बंधनकारक असतील.

23) हा जाहीरनामा प्रसिध्द होण्यापूर्वी ज्या उमेदवारांनी पोलीस पाटील पदांसाठी कोणत्याही प्रकारचे अर्ज केले असतील ते सर्व अर्ज रद्द झाले आहेत, असे समजण्यात येईल.

24) परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने अर्जासोबतच भरणा करायचे आहे याची नोंद घ्यावी.

25) **परिक्षा शुल्क आरक्षीत /आर्थिक दुर्बल घटक प्रवर्गासाठी करीता 200/-रु.आणि खुला प्रवर्गासाठी-300/-रु.**

२६) उमेदवारास काही अडचन आलयास तर त्यांनी ऑनलाईन या **www.sdomoudapp.in** संकेतस्थळावर दिलेले HELPDESK वर जाऊन किंवा तहसिल कार्यालयात मदतकेंद्र HELPDESK यांचे कडे जाऊन माहिती घ्यावी.

**ऑनलाईन (Online) अर्ज करण्याची पध्दत :-**

1) प्रस्तूत परिक्षेसाठी फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाही. उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ईमेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा/अपूर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्याव्दारे पाठविल्या जाणाऱ्या सुचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहील. तसेच ईमेल आयडी व मोबाईल वहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना उपविभागीय अधिकारी, मौदा हे जबाबदार असणार नाही. सदर संकेत स्थळावर भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहील.

2) पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-Based) ऑनलाईन अर्ज **www.sdomoudapp.in** या वेब साईडव्दारे सादर करणे आवश्यक राहील. ऑनलाईन अर्ज स्विकारण्याची अंतिम दिनांकानंतर संकेत स्थळावरिल अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

3) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना, शैक्षणिक कागदपत्रे अन्य प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. तथापि ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवारांनी त्यांच्या पात्रतेनूसार संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहील व याबाबत उमेदवारांस

कोणत्याही प्रकारची तक्रार करता येणार नाही. तसेच ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही.

4) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना उमेदवारांजवळ स्वत:चा ईमेल आयडी असणे आवश्यक आहे. पुढील सर्व पत्र व्यवहार उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नोंदविलेल्या ईमेल आयडी व्दारे होणार असल्याने अचूक ईमेल आयडी नोंदविणे आवश्यक आहे व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

5) स्वत:च्या अद्यावत विहीत पासपोर्ट साईज फोटो व सही स्कॅन करुन ऑनलाईनच संकेत स्थळावरिल सुचनेनूसार अपलोड करणे अनिवार्य आहे. अपलोड करतांना फोटोची व सहीची प्रत्येकी साईज 35 केबीपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. **तसेच उमेदवारांनी परिक्षेच्या दिवशी फोटो असलेले अधिकृत ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.**

6) उमेदवारांची लेखी परिक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या पात्रतेनूसार कोणतीही कागदपत्रे पूर्व तपासणी/छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाही. उमेदवारांची ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनूसार अंतरीम यादी प्रसिध्द करुन मुळ कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतर उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे अधिकार पोलीस पाटील पद भरती निवड समितीकडे राखून ठेवण्यात आलेले आहे व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

7) ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याच्या सविस्तर सुचना **www.sdomoudapp.in** या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

8) उमेदवाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरतांना जाहीरात डाऊनलोड करुन काळजीपूर्वक वाचावी.

9) ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन भरलेल्या उमेदवाराची स्थिती/परिक्षा प्रवेश पत्र/ वेळापत्रक/ परिक्षा केंद्र /बैठक क्रमांक इत्यादीबाबतची माहिती वर दिलेल्या वेबसाईडवर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल. यासाठी स्वतंत्र पत्र व्यवहार केला जाणार नाही. **सदर संकेत स्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.**

10) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर **www.sdomoudapp.in** या संकेत स्थळावरुन परिक्षेचे प्रवेश पत्र डाऊनलोड करुन घ्यावे. कोणत्याही उमेदवारास पोष्टाव्दारे प्रवेशपत्र पाठविले जाणार नाही व प्रवेश पत्राशिवाय कोणत्याही उमेदवारास **परिक्षा केन्द्रात** प्रवेश दिला जाणार नाही.

11) लेखी परीक्षा ऑफलाईन होणार आहे. लेखी परिक्षा झाल्यावर दोन तासानी आदर्श उत्तरपत्रिका प्रकाशित केली जाईल. लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेमध्ये कोणताही प्रश्न चुकीचा आढळल्यास लेखी परिक्षेच्या नंतरच्या दिवशी दुपारी 12.00 वाजेपर्यंत त्याबाबत लेखी आक्षेप निवड समिती, मौदा यांच्याकडे नोंदवावे लागेल. याबाबत उपविभागीय दंडाधिकारी तथा अध्यक्ष पोलीस पाटील निवड समिती, मौदा यांचे निर्णय अंतिम राहील.

12) प्रवेश पत्र पोष्टाने पाठविले जाणार नाही, याची नोंद घ्यावी. उमेदवाराने स्वत: विहीत वेळेत आपले प्रवेश पत्र (Hall Ticket) डाऊनलोड करुन प्रिंट करून घ्यावे व परीक्षेच्या वेळी सोबत ठेवावे.

दिनांक :-02 /05/2023
ठिकाण :- मौदा

(मलीक विराणी)
**उपविभागीय दंडाधिकारी, मौदा तथा**
**अध्यक्ष पोलीस पाटील भरती 2023**
**निवड समिती, मौदा**

प्रतिलीपी : माहिती व आवश्यक कार्यवाहीस सादर/अग्रेषित.

1) मा. जिल्हादंडाधिकारी नागपूर
2) मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, नागपूर
4) मा. जिल्हा माहीती अधिकारी, नागपूर
3) उपविभागीय पोलीस अधिकारी, कन्हान/रामटेक
4) तहसिलदार, मौदा/कामठी – सदस्य सचिव.
5) गट विकास अधिकारी, मौदा/कामठी.

**तालुका दंडाधिकारी व गटविकास अधिकारी** यांनी सदर जाहीरात आपले कार्यालयाचे सूचना फलकावर दर्शनी भागात प्रसिध्द करावे आणि तसा अहवाल या कार्यालयास सादर करावे.

तसेच आपले अधिनस्त संबंधित गावाचे तलाठी व ग्रामसेवक यांना त्यांचे कार्यालयाचे सुचना फलकावर जाहिरात दर्शनी भागात प्रसिध्द करून प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास सादर करण्याचे निर्देश आपले स्तरावरून देण्यात यावे.

6) पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन मौदा/अरोली/नविन कामठी/जुनी कामठी/कन्हान/रामटेक/वाठोडा/खापरखेडा/कळमना सदर जाहिरात आपले कार्यालयाचे सुचना फलकावर दर्शनी भागात प्रसिध्द करून प्रसिध्दी अहवाल उलट टपाली या कार्यालयास सादर करणेची दक्षता घ्यावी.

7) शिपाई,उपविभागी दंडाधिकारी कार्यालय मौदा यांना सुचित करण्यात येते की, सदरची जाहिरात उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय मौदा सुचना फलकावर प्रसिध्द करून प्रसिध्दी अहवाल सादर करणेची दक्षता घ्यावी.

(मलीक विराणी)
**उपविभागीय दंडाधिकारी, मौदा तथा**
**अध्यक्ष पोलीस पाटील भरती 2023**
**निवड समिती, मौदा**